# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

---

दि.११/०८/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

### <u>'घरोघरी तिरंगा' उपक्रमाच्या जनजागृतीसाठी महानगरपालिकेमार्फत बाईक रॅलीचे आयोजन</u>

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मा.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम दि.१३ ऑगस्ट, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत संपूर्ण देशात साजरा करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातही 'घरोघरी तिरंगा' या उपक्रमात जास्तीत जास्त नागारीकांनी सहभागी व्हावे यासाठी विविध प्रकारे प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे. 'घरोघरी तिरंगा' या उपक्रमांतर्गत सदर उपक्रमाची जनजागृती करण्याच्या उद्देशाने वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत शुक्रवार **<u>दि.१२ ऑगस्ट, २०२२</u>** रोजी सकाळी **<u>११.००</u>** वाजता **नवीन विवा कॉलेज, विरार (पश्चिम)** ते **वसई गांव कोर्ट** पर्यंत **<u>बाईक रॅलीचे</u>** आयोजन करण्यात आले आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**